**सरकारतर्फे साक्षीदार क्र. १** **<u>सं.फौ.ख.क्र. ३७९/२०२०</u>**

महाराष्ट्र शासन वि. यजाज परवेज

**नि.क्र. १०**

मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,

माझे नाव – राजेश पुंडलिक चौरे,

वय – ५४ वर्षे,

व्यवसाय – चालक,

राहणार – जलालखेडा, ता. नरखेड, जि. नागपूर

**<u>सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री.व्ही. यु. मिरचे यांच्यामार्फत शपथेवर सुरूः–</u>**

दि. ०९/०४/२०२० रोजी पोलीसांनी मला पंचनाम्यासाठी बोलाविले नव्हते. आता मला दि. ०९/०४/२०२० रोजीचा घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात येत आहे. त्यावरती माझी सही आहे. त्यातील मजकुराबाबत मला काहीही माहिती नाही. मी शेतामध्ये जात असतांना रस्त्यावर पोलीसांच्या सांगण्यावरुन त्यावर सही केली त्यास सहीपुरता निशाणी **निशाणी ११** देण्यात येत आहे. मी आरोपीला ओळखत नाही.

**(सदर साक्षीदार अभियोगपक्षास सहकार्य करीत नसल्याने विद्यमान सहाय्यक सरकारी अभियोक्तांनी सदर साक्षीदार उलटतपासणीची परवानगी मागितली. साक्षीदारास उलटतपासणीमध्ये विचारल्या जाणारी प्रश्न विचारण्याची परवानगी *भारतीय पुरावा कायदा चे कलम १५४ / भारतीय साक्ष अधिनियम, २०२३ चे कलम १५७* प्रमाणे देण्यात येत).**

**२.** हे म्हणणे खरे नाही की, दि. ०९/०४/२०२० रोजी पोलीसांनी मला पंचनाम्यासाठी मुस्लीम कबरीस्तान, जलालखेडा येथे बोलाविले होते. हे मला माहित नाही की, आरोपीने जिल्हा दंडाधिकारी नागपुर यांच्या आदेशाचे उल्लंघन करुन कोव्हीड १९ च्या प्रादुर्भावावेळी बिना मास्क चे काही कारण नसतांना घराबाहेर फिरत होता. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी घटनास्थळ पंचनामा वाचून दाखविला होता व त्यानंतर मी पंचनाम्यावर सही केली होती. मी दुसरा पंच धनंजय यास ओळखतो. मी आरोपीला ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला वाचविण्यासाठी आज रोजी शपथेवरती खोटी साक्ष देत आहे.

**<u>सरतपास पुर्ण.</u>**

<u>आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. व्ही. एम. क्षीरसागर यांच्यामार्फत उलटपासः–</u>

<u>उलटतपास नाकारले.</u>

<u>फेरतपास नाही.</u>

माझे समक्ष,

स.सा.वा.दा.ब.अ.क.केले.

(रोहन विजयकुमार थाईल)

न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, नरखेड

न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग,
नरखेड, नागपूर.

दिनांकः १२/०३/२०२६.

दिनांकः १२/०३/२०२६

माझे सरतपासणी व उलटतपासणी चे पान नं. 01 ते 02 मला वाचून दाखविले व ते माझ्या सांगयाप्रमाणे आहे व **Explanation V**, **Paragraph No**. 16, **Chapter VI of Criminal Manual** प्रमाणे मला त्याचे विनामुल्य खरी नक्कल मिळालेली आहे.

साक्षीदाराची सही
(राजेश पुंडलिक चौरे)

विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता
(श्री. व्ही. यु. मिरचे)